## महाराष्ट्र विधानसभा

**पत्रक भाग - दोन**

**सोमवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ / श्रावण ३०, १९४५ (शके)**

**लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण**

**१२०.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या चतुर्थ सत्रातील एकूण २४७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ४४ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण २०३ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ५५ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२, क्रमांक ७ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. आता प्रलंबित १४८ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ६१ निवेदने गुरुवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. एकूण ८७ निवेदनांपैकी ५३ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ५८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. त्यापैकी ३४ निवेदनांपैकी ०६ निवेदने दिनांक १५ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ६० अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. एकूण २८ निवेदनांपैकी ०५ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक ०३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ७३ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. आता २३ निवेदनांपैकी ०४ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७७ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. आता एकूण १९ प्रलंबित निवेदनांपैकी ०६ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २१ ऑगस्ट, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव - १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

लक्षवेधी सूचना क्र. १८४०

## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

मा.श्री. दिलीप लांडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र. १८४०** पुढीलप्रमाणे आहे :-

" महाराष्ट्रातील असंख्य रिक्षा चालक-मालक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याच्या दृष्टीने तसेच सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक व आर्थिक व मानसिक उन्नती घडविण्यासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या धर्तीवर शासकीय रिक्षा चालक-मालक कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन असणे, सदर प्रस्तावावर शासनाकडून अंमलबजावणी होण्यास होत असलेला विलंब, याकडे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, सदरहू प्रस्तावावर अंमलबजावणी तातडीने झाल्यास कल्याण मंडळाच्या माध्यमातून नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत करण्यास मदत होणार असल्याने याबाबत शासनाने युध्द पातळीवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन

असंघटीत कामगार हा आर्थिकदृष्टया संवेदनशील घटक असुन, केंद्र सरकारने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१.१२.२००८ रोजी असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारित केला आहे. केंद्र सरकारने असंघटीत कामगारांचा राष्ट्रीय डेटाबेस (NDUW-National Database of Unorganised Workers) तयार करण्याचा निर्णय घेतलेला असून, असंघटित कामगारांची नोंदणी करण्याकरीता दिनांक २६.०८.२०२१ रोजी ई-श्रम पोर्टल सुरू करण्यात आले आहे. दि.३१.०७.२०२३ अखेर राज्यात ई-श्रम पोर्टल वर सुमारे १३७ लाख असंघटीत कामगारांनी नोंदणी केलेली आहे. ऑटो रिक्षा व टॅक्सी तसेच प्रवासी तथा व्यावसायीक वाहनचालक, क्लीनर या असंघटित कामगारांचा असंघटित क्षेत्रात समावेश होत असुन, सदर असंघटित कामगारांनाही ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करता येणार आहे.

राज्यातील असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा व विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी दि.०६.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार "महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ" व त्याचे अंतर्गत परिशिष्ट-१ मधील उद्योग/व्यवसाय क्षेत्रनिहाय ३९ आभासी (Virtual) मंडळे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. दि.०६.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट-१ मधील अनुक्रमांक ५ मध्ये व्यावसायिक वाहनचालक म्हणून ऑटो रिक्षा व टॅक्सी तसेच प्रवासी तथा व्यावसायीक वाहनचालक, क्लीनर या कामगारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

---------------------------------

शेता.एच-२०२८ (७००-८-२३)

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे (चतुर्थ) हिवाळी अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१७७०**

श्री.दत्तात्रय भरणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७७० पुढीलप्रमाणे आहे:-

**" धनगर समाजाला आरक्षण देणेबाबत नेमण्यात आलेल्या केळकर समितीच्या शिफारशीनुसार आरक्षण सुचित बदल केलेला असणे, मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्यात धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करण्यात आलेला असणे, मात्र आजही राज्यात धनगर समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्यात आला नसल्याचे निदर्शनास येणे, मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्यात धनगर समाजाला आदिवासी समाजाचे आरक्षण दिलेले असणे, राज्यात 'धनगर' व 'धनगड' ही एकच जात असून राज्यामध्ये 'धनगड' असा एकही व्यक्ती अस्तित्वात नसणे, राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याचे आश्वासन फक्त कित्येक वर्षे दिले जात असणे, सरकारचे आपल्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी धनगर समाजाने राज्यभर आंदोलन, निदर्शने, मोर्चे काढलेले असणे, धनगर समाजाला आरक्षण मिळण्यासाठी व सर्वेक्षणासाठी नेमलेली खाजगी संस्था रद्द करणे, धनगर समाजाला आरक्षणाचा लाभ मिळावा याकरिता लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्यायमंत्री यांचेकडे जुलै,२०२२, ऑगष्ट,२०२२ च्या पहिल्या आठवड्यामध्ये तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर मागण्यांवर निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील धनगर समाजामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, मराठा समाजाची सर्वाधिक लोकसंख्या असणे, मागील अनेक वर्षापासून हा समाज आरक्षणासाठी संघर्ष करीत असणे, संघर्ष करुनही आजपर्यंत सरकारकडून आरक्षण देण्यास टाळाटाळ झालेले असणे, मराठा समाजाने आरक्षण मिळणेसाठी राज्यभरात मुकमोर्चाचे आयोजन केलेले असणे, या मोर्चामधून प्रंचड जनसमुदाय आरक्षणसाठी रस्त्यावर उतरलेला असणे, प्रंचड संघर्षानंतर शासनाने जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणास सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली असणे, त्यामुळे मराठा समाजात पसरलेला असंतोष, तसेच मुस्लीम समाज हालाखीचे जीवन जगत असून समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनास अपयश आलेले असणे, या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मुस्लीम समाजाला आरक्षण मिळावे अशी त्यांची न्याय्य मागणी असणे, मुस्लीम समाजाला आरक्षण मिळावे यासाठी राज्यभरामध्ये अलिकडील काळात वारंवार आंदोलने केलेली असणे, मुस्लीम समाजाच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जात असणे, तसेच मातंग समाज हा महाराष्ट्रासह संपुर्ण देशात वास्तव्यास असणे, या समाजातील बहुतांशी नागरिक भूमीहीन असून, मोलमजुरी करून आपले जीवन जगत असणे, उच्च शिक्षणापासून हा समाज वंचित असणे, शासनाने त्यांच्या मागण्या व प्रश्न सोडवून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता असणे, या विषयी शासनाने करावयाची कार्यवाही, व शासनाची भूमिका."**

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करणे याबाबतची कार्यवाही आदिवासी विकास विभागाकडून करण्यात येत आहे. धनगर समाजाचा आदिवासी जमातीमध्ये समावेश करणे या मागणीच्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या शासनपत्र, दि.१२.०६.१९७९ अन्वये धनगर समाजाचा अनुसूचित जमातीच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी केंद्र शासनास शिफारस करण्यात आली. तथापि, केंद्र शासनाच्या दि.२६.०२.१९८१ रोजीच्या पत्रान्वये अनुसूचित जमातीमध्ये समावेश होण्यासंबंधी निकषाबाबत राज्य शासनास कळविले. सदर निकष धनगर समाज व तिच्या तत्सम/उपजातीमध्ये

आढळत नाहीत म्हणून धनगर जातीचा अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये समावेश करण्याबाबत केलेली शिफारस राज्य शासनाने दि.६.११.१९८१ अन्वये मागे घेतली. तद्नंतर महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१५ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानपरिषद सभागृहामध्ये तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी धनगर व धनगड एक आहेत किंवा कसे याबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे आणि टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या स्वायत्त संस्थेकडून संशोधन अहवाल प्राप्त करून घेण्यात येणार आहे, असे आश्वासन दिले होते. प्रस्तुत प्रकरणी शासनपत्र, दि.२२.०९.२०१५ च्या अनुषंगाने टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी अंतिम अहवाल दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी सादर केला. दि.२७.०२.२०१९ रोजी संपन्न झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीन्वये शासन निर्णय, दि.१.०३.२०१९ मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती गठीत करण्यात आलेली आहे. दि.२.०३.२०१९ रोजीच्या मंत्रिमंडळ उप समितीची बैठक होऊन धनगर समाज अभ्यास अहवालाच्या संदर्भात कायदेशीर मुद्यांच्या अनुषंगाने मा. महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे अभिप्राय घेण्याबाबत निर्देश देण्यात आले. सदर निर्देशानुसार टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांनी सादर केलेल्या धनगर समाजाच्या अहवालाबाबतची नस्ती विधी व न्याय विभागामार्फत दि.०४.१०.२०१९ रोजी मा.महाधिवक्ता यांच्याकडे अभिप्रायार्थ सादर करण्यात आलेली होती. तथापि, सदर नस्ती फेब्रुवारी, २०२३ मध्ये विशिष्ट अभिप्रायांशिवाय आदिवासी विकास विभागास प्राप्त झाली आहे. सदर प्रस्ताव पुढील निर्णयास्तव वरिष्ठ पातळीवर सादर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ई.एस.बी.सी.) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१) अन्वये "शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग" निर्माण करण्यात आला होता. आरक्षण अधिनियम, २०१४ च्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.२०५३/२०१४ व इतर संलग्न याचिका प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१४.११.२०१४ च्या आदेशान्वये सदर अध्यादेशास (महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३) तसेच आरक्षण अधिनियम, २०१४ ( सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१) यांना अंतरिम स्थगिती दिली. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र.३१५१/२०१४ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.७.४.२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार, शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दि.१४.११.२०१४ पूर्वी अशा आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास, अशा पदांवर ११ महिन्यांच्या कालावधीकरिता अथवा मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता खुल्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या देण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक, दि.२.१२.२०१५ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले. या नियुक्त्यांना मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार वेळोवेळी मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत.

तद्नंतर सन २०१८ मध्ये पूर्वीचा अधिनियम-२०१४ निरसित करुन महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एस.ई.बी.सी.) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२) अन्वये "सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग" निर्माण करण्यात आला व त्याअन्वये, सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी १६ टक्के आरक्षण देण्यात आले आहे तसेच अधिनियम, २०१४ अनुसार देण्यात आलेल्या नियुक्त्यांना/प्रवेशांना संरक्षण देण्यात आले. सदर आरक्षण अधिनियम-२०१८ ला मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.१७५/२०१८ तसेच इतर याचिकांद्वारे आव्हान दिले होते. मा.उच्च न्यायालयाने दि.२७.०६.२०१९ रोजी अंतिम निकाल देवून आरक्षण अधिनियम, २०१८ मध्ये विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीशी सहमती न दर्शविता कायम केला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने मा.मंत्रीमंडळाच्या दि.१.७.२०१९ रोजीच्या बैठकीत उक्त अधिनियम,

२०१८ मध्ये अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांखेरीज, शैक्षणिक संस्था तसेच खाजगी शैक्षणिक संस्था यांमधील प्रवेशाच्या एकूण जागांच्या "१२ टक्के" आणि लोकसेवा व सरळसेवा प्रवेशाच्या एकूण नियुक्त्यांच्या "१३ टक्के" या सुधारणा करण्यात आल्या तसेच मा.विधान मंडळाच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण (सुधारणा) अधिनियम, २०१९, दि.३.७.२०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. तसेच या प्रवर्गाकरिता सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करण्यात आली.

मा.उच्च न्यायालयाच्या दि.२७.६.२०१९ च्या आदेशान्वये आरक्षण अधिनियम, २०१८ वैध ठरविला असल्याने सदर अधिनियमातील कलम-१८ मधील तरतूदी वैध असल्याने संरक्षित झालेल्या आहेत. त्यामुळे दि.९.७.२०१४ ते दि.१४.११.२०१४ या कालावधीतील ईएसबीसी आरक्षणासह निवड प्रक्रीया राबविण्यात आलेल्या नियुक्त्यांबाबत पदभरतीची कार्यवाही करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाच्या दि.११.७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या असून त्यानुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून निवडप्रक्रीया पूर्ण करण्याची कार्यवाही करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गाकरिता उपरोक्त आरक्षण अधिनियम, २०१८ तसेच आरक्षण (सुधारणा) अधिनियम, २०१९ यांना मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मराठा आरक्षणाच्या कामकाजाकरीता मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आलेली होती.

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ मध्ये दि.९.९.२०२० रोजी अंतरिम आदेश पारित केले. सदर निर्णयाच्या अनुषंगाने एसईबीसी प्रवर्गातील उमेदवारांना दि.९.१०.२०२० च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक, सेवाविषयक तसेच सामाजिक सोयी-सुविधा देण्यात आलेल्या आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.५.०५.२०२१ रोजी दिलेल्या अंतिम आदेशान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) आरक्षण अधिनियम,२०१८ अवैध ठरवून मराठा आरक्षण रद्द केले. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द करतांना त्यामध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या दि.२७.०६.२०१९ च्या निर्णयानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणास दि.९.९.२०२० रोजी स्थगिती देईपर्यंत SEBC वर्गातून मराठा समाजातील उमेदवारांच्या शासन सेवेमध्ये केलेल्या नियुक्त्या कायम राहतील, असा निर्णय दिला. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.५.०५.२०२१ रोजीच्या अंतिम निर्णयाची समीक्षा करण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.११.०५.२०२१ अन्वये माजी न्यायाधीश श्री.दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली समीक्षा समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीच्या शिफारशीनुसार मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका क्र.१४/२०२२ दाखल करण्यात आली होती. सदर पुनर्विलोकन याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.११.०४.२०२३ च्या निर्णयान्वये खारीज करण्यात आली आहे. तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयात उपचारात्मक याचिका (Curative Petition) दाखल करण्याची कार्यवाही शासनामार्फत करण्यात येत आहे.

"महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम, २०२२" अन्वये १०६४ उमेदवारांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आलेली असून या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडून दि.२१.९.२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच या पदांव्यतिरिक्त ४८९ अधिसंख्य पदे निर्माण करण्यासाठी "महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती विधेयक (सुधारणा), २०२२" पारित करण्यात आलेला असून सदर अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दि.३१.१.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०९.०७.२०१४ रोजीच्या अध्यादेशानुसार मुस्लिम (विशेष) मागासप्रवर्ग) समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. यामध्ये मुस्लिम धर्मातील एकूण ५० मागास घटकांना आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय राहणार होता. तथापि, याबाबत मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने दि.१४.११.२०१४ रोजी या प्रकरणी अंतरिम निर्णय दिला आहे. सदर अंतरिम आदेशाद्वारे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आलेले आहे. परंतु खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. सदर अध्यादेशाचे दि.२३.१२.२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने अध्यादेश व्यपगत झाला आहे. तथापि, दि.०९.०७.२०१४ ते दि.२३.१२.२०१४ या काळातील शासकीय तसेच अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच दि.०९.०७.२०१४ ते दि.१४.११.२०१४ या दरम्यानच्या काळातील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या संरक्षित करण्यात आलेल्या आहेत.

अनुसूचित जातीविषयक कल्याणकारी धोरणाचा मातंग समाजाच्या व्यक्तींना योग्य प्रमाणात लाभ व्हावा व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शासनाने दि.१.०८.२००३ रोजी क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग गठीत केला होता. सदर आयोगाच्या एकूण ८२ शिफारशी केलेल्या आहेत, त्यापैकी ६८ शिफारशी शासनाने शासन निर्णय, दि.३१.१२.२०११ अन्वये तत्वत: मान्य केल्या. अनुसूचित जातींचे अ,ब,क,ड असे उपजातीनिहाय वर्गीकरण करणे या शिफारशीसह केंद्र शासनाच्या अखत्यारितील अन्य शिफारशी अशा एकूण १४ शिफारशी अमान्य करण्यात आलेल्या आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित ३९ शिफारशी असून अन्य शिफारशी इतर विभागांशी संबंधित आहेत, तर एक शिफारस सर्व विभागांशी संबंधित आहे. इतर विभागांशी संबंधित शिफारशींबाबत त्या-त्या संबंधित विभागांकडून कार्यवाही करण्यात येते, त्यानुसार राज्यात अनुसूचित जातींकरिता राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेंतर्गत मातंग समाजास सुध्दा लाभ दिला जातो.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेकडून पाठपुरावा करण्यात येतो. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधित शिफारशींपैकी १९ शिफारशींची अंमलबजावणी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ यांचेकडून करण्यात येते. शासन निर्णय, क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.४६/महामंडळे, दि.०८ जुन, २०२२ अन्वये साहित्यरत्न लोकशाहिर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलामध्ये रू.३००.०० कोटीवरून रू.१००० कोटीपर्यंत वाढ करण्यात आली आहे. शासनामार्फत सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजनेकरिता रू.४,५६७.७० लाख व बीजभांडवल योजनेकरिता रू.१०,०००.०० लाख निधीची तरतूद आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महामंडळास विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत एकूण प्राप्त निधीअंतर्गत महामंडळाकडून विविध योजना राबविण्यात येतात. विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूण निधीच्या १०% रक्कम ही प्रशिक्षण योजनेवर खर्च करण्यात येते. मातंग समाजातील इयत्ता ४ थी पासून पुढे शिक्षण घेतलेल्या १८ ते ३५ वयोगटातील युवक/युवतींना स्वयंरोजगाराकरिता विविध व्यवसायिक प्रशिक्षण शासन मान्य संस्थांमार्फत दिले जाते. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.३ लाख पर्यंत आहे अशा कुटुंबातील अर्जदाराना रु.५०,०००/- पर्यंत प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायासाठी बँकेच्या सहाय्याने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते तसेच महामंडळामार्फत लाभार्थीस अनुदानही दिले जाते. शहरी व ग्रामिण भागासाठी उत्पन्न मर्यादा रक्कम रू.३,००,०००/- असणा-या कुटूंबांना रु.५०,००१/-ते रु.७,००,०००/- पर्यंतच्या गुंतवणूक असलेल्या मंजूर कर्ज प्रकरणांत गुंतवणूकीच्या प्रमाणात महामंडळाकडून २०% सहभाग (रु.१००००/- अनुदानासह) बीजभांडवल कर्जरुपात ४% व्याजदराने मंजूर करण्यात येते. तसेच राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (NATIONAL SCHEDULED CASTES FINANCE AND DEVELOPMENT CORPORATION-

NSFDC) यांचेकडून मंजुर होणाऱ्या कर्ज योजने अंतर्गत ही बीजभांडवल कर्ज म्हणुन लाभार्थीस वितरीत केला जातो. शासन निर्णय, दि.३०.११.२००४ अन्वये बीजभांडवल योजनेअंतर्गत थेट कर्ज योजनेमध्ये २% व्याज दराने लाभार्थींना कर्ज निधी वितरीत केला जातो. मातंग समाजातील इयत्ता १० वी ,१२ वी, पदवी व पदविका व पदव्युत्तर परीक्षेत कमीत मी ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना पुढील शिक्षणासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती दिली जाते. राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळाच्या (NATIONAL SCHEDULED CASTES FINANCE AND DEVELOPMENT CORPORATION-NSFDC) निधीतून रू.५.०० लाखापर्यंत भांडवल असलेल्या व्यवसायांकरिता ५ वर्षांकरिता मुदत कर्ज दिले जाते. सन २०००-०१ पासून प्रती लाभार्थी रू.५०,०००/-च्या मर्यादेत लघुत्रऋण वित्त योजना राबविण्यात येते. सदर योजनांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारितील साहित्यरत्न लोकशाहिर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ यांचेकडून अनुदान देण्यात येते. राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (NATIONAL SCHEDULED CASTES FINANCE AND DEVELOPMENT CORPORATION-NSFDC) द्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत मातंग समाजातील युवक-युवतींना देशांत व परदेशांत उच्च शिक्षण घेण्याकरिता शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येते. सदर कर्जाची परतफेड शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यापासून अथवा नोकरी लागले पासून करावयाची असते.

***************

# महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

**सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन**

**श्री.सुरेश भोळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जळगाव महानगरपालीकेच्या आयुक्तांना श्री.अतुल मुंदडा यांनी दि.२/१२/२०२२ रोजी वकिलांमार्फत नोटीस देणे, नियमानुसार आरक्षणमुक्त झालेल्या मौजे पिंप्राळा गट क्र.१२५ चे आवश्यकता नसतांना संपादन केल्याचे आरोप करणे, जमीन मालक श्री.सोनी यांना गैरफायदा देण्यासाठी मनपाचे संबंधित अधिकारी यांनी संगनमत करून मा.सर्वोच्च न्यायालयाची दिशाभूल केल्याचा आरोप करणे, शासनाच्या नगरविकास विभागाने दि.२४/०५/२०२२ रोजी पत्र देवून मनपा आयुक्तांकडून अहवाल मागवूनही मनपा आयुक्तांनी अहवाल न दिल्याचा आरोप करणे, श्री.धीरज सोनी या व्यापारीची मनपाच्या विधी समिती स्वीकृत सदस्यपदी निवड होणे, श्री.धीरज सोनी हे आधीपासूनच मनपाचे न्यायालयीन प्रकरणे हाताळत असल्याचे विधी समितीच्या दि.०८/१२/२०१७ रोजीच्या ठराव क्र.६ मध्ये नमूद असणे, सोनी यांनी मौजे मेहरूण शिवारातील सर्व्हे क्र.४७८/१ब/३ मधील क्रीडांगणासाठी आरक्षित भूखंड क्र.७ ते १० खरेदी-विक्री करून ९० लाखाची कमाई करणे, सोनी यांनी मौजे जळगाव सर्व्हे क्र.४१७/१अ/१ ही क्रीडांगणासाठी आरक्षित शेतजमीन खरेदी करून आरक्षणमुक्त करून घेणे, श्री.धीरज सोनी यांना मनपाच्या कायदेशीर प्रकरणांमध्ये अप्रामाणिक हेतूने हस्तक्षेप करू देणे, सोनी यांना विनापरवानगी बांधकाम करू देणे, सोनी यांनी यापूर्वी खरेदी केलेले आरक्षित भूखंड व आरक्षित शेतजमीन मोक्याच्या ठिकाणी असल्याने आरक्षणमुक्त होऊ देणे, परंतु मौजे पिंप्राळा गट क्र.१२५ ही ओसाड परिसरात असल्याने व तिचे बाजारभाव कमी असल्याने तिचे मुद्दाम संपादन करून घेणे, श्री.अतुल मुंदडा यांनी सादर केलेल्या महत्वपूर्ण न्यायनिर्णयांकडे हेतुपुरस्सरपणे दुर्लक्ष करणे, शासनाकडे अहवाल सादर न करणे, सोनी यांच्या आरक्षणमुक्त झालेल्या जमिनीसाठी कोट्यावधी रुपये उधळणे, मनपाच्या निधीचा गैरवापर करणे, नोटीसमध्ये श्री.सोनी यांची जमीन व श्री.कुमारसिंग पाटील यांची जमीन ह्या दोन्ही जमिनींच्या आरक्षणाबाबत मनपाने विरुद्ध भूमिका घेतल्याचे आरोप करणे, या सर्व घडामोडींवरून श्री. धीरज सोनी यांचेशी मनपाचे संबंधित अधिकारी व पदाधिकारी यांनी अप्रामाणिक हेतुने हात मिळवणी केल्याचे आरोप करणे, कट रचून अप्रामाणिक हेतूने मनपाचा कोट्यावधीचा निधी लाटला म्हणून पोलिसांकडे फिर्याद देण्याचे श्री.अतुल मुंदडा यांनी नोटीस मध्ये नमूद करणे, परंतु मनपा आयुक्तांनी कोणतीही दखल न घेणे, या बाबत शासनाने सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

२१८१ | ३५-५०१ (०५-०७-2023)

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मौजे मेहरुण स.नं.४७८/१/ब३ मधील सन १९८९ मध्ये मंजुर झालेल्या रेखांकनातील प्रस्तावित असलेल्या भुखंड क्र. ७,८,९ व १० या जागेवर आरक्षण क्र.१६२, चिल्ड्रन पार्क हे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले होते. भुखंड क्र.७,८,९ व १० या मध्ये तत्कालीन नगरपालिकेने दि.३०/१२/१९७१ रोजी प्रसिद्ध केलेल्या सुधारीत विकास योजने मध्ये प्रस्तावित केलेले आरक्षण क्र.१६२ खेळाचे मैदान असल्याने ते दर्शवून दि.२९/०४/१९८७ अन्वये रेखांकनास मंजुरी देण्यात आलेली आहे.

जमीनमालक यांनी दि.१७/०४/२००८ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये मोजे मेहरुण स.नं.४७८/१/ब३ या जागेवर प्रस्तावित असलेल्या आरक्षण क्र.१६८ लहान मुलांचे खेळाचे मैदान संदर्भात खरेदी सुचना बजाविली होती. तद्नंतर सदर जागेवरील आरक्षण व्यपगत (Lapsed) झाले म्हणून घोषीत करुन मिळणे बाबत नवीन खरेदी घेणार जमिन मालकानी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र.९६८५/२०१६ दाखल केली होती. उक्त याचिकेचा निकाल दि.२५/०४/२०१७ रोजी झालेला असुन या निर्णयानुसार सदर जागेवरील आरक्षण व्यपगत झाले आहे. त्यानुसार दि.१२/१०/२०१७ च्या अधिसुचने अन्वये सदर भूखंडावरील आरक्षण व्यपगत करण्यात आले आहे.

सदर भूखंडाचे एकत्रीकरण प्रस्तावास महानगरपालिकेने दि.०७/०२/२०१८ अन्वये मंजुरी दिलेली असून रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम नकाशांना, दि.०८/०३/२०१८ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी सदर परिसरातील रहिवासी यांनी सदर जागेत चिल्ड्रन पार्क किंवा खेळाचे मैदान हे आरक्षण प्रस्तावित करणेबाबत प्रतिवादी यांना निर्देशीत करण्याबाबत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ येथे रिट याचिका क्र.३४६३/२०१८ दाखल केलेली होती. सदर याचिका मा.न्यायालयाने दि.११/०१/२०१९ रोजी फेटाळलेली आहे. जळगाव शहराच्या वाढीव हदीच्या मंजुर विकास योजना नकाशामध्ये जळगाव स.नं.४१७/१अ/१ ही जमिन आरक्षण क्र.१४,क्रिडांगण व १२.०० मी रुंद वि.यो.रस्ता या प्रयोजनासाठी आरक्षीत दर्शविलेली आहे. मुळ जमिन मालक यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र.७०८२/२०१५ दाखल केलेली होती. सदर याचिकेचा निकाल दि.२२.०२.२०१७ रोजी दिलेला असुन सदर निकालात उक्त आरक्षण हे आरक्षण मुक्त झाल्याचे आदेश पारीत केलेले आहे.

उक्त जागेवर विद्यमान जमिन मालक सौ.आरती धिरज सोनी व इतर यांनी भुमी अभिंन्यास मंजुरीसाठी सादर केले असता महानगरपालिकेने दि.२३/०६/२०२१ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ अंतिम मंजुरी दिलेली आहे.

मौजे पिंप्राळा गट नं.१२५ ची जमिन मंजुर विकास योजनेनुसार बगीचासाठी आरक्षित असल्याने तसेच विकास योजना मंजूर होऊन १० वर्ष पेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने जमिन मालक यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेल्या खरेदी सुचनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेने भुसंपादन प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रकरणी भूसंपादन खर्चास मान्यतेसाठी महासभे समोर प्रस्ताव सादर केला असता महासभेने खर्चास मान्यता न देता टी.डी.आर घेणे बाबत निर्णय पारित केलेला आहे. भुसंपादन प्रक्रिया पूर्ण करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १६२ नुसार विशेष अधिकार प्रदान करणेसाठी महानगरपालिकेच्या विनंतीनुसार शासनाने आयुक्त यांना विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती केली. दरम्यानच्या काळात जमिन

मालक यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठ येथे रिट याचिका दाखल केली असता मा.उच्च न्यायालयाने भुसंपादनासाठी ०१ वर्षाची मुदत वाढवून दिली या निर्णया विरुध्द जमिन मालक यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी.दाखल केली मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार व आदेशानुसार भुसंपादनाची पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी विहीत मुदतीत पूर्ण केली. तसेच, भुसंपादन प्रकिया पुर्ण करणेकामी दि.२१/०२/२०२० अन्वये आयुक्त यांना विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यानुसार मा.न्यायालयात उपस्थित मुद्याच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

श्री.अतुल मुंदडा यांनी उपस्थित केलेल्या अर्जात लातुर प्रकरणाचा उल्लेख केलेला असुन मा.सर्वोच्च न्यायालयाने संपादनाची मुदतवाढ चुकीची ठरवून आरक्षण व्यपगत झाल्याचे निर्णय दिलेला असल्याचे नमुद आहे. तथापि प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय ,औरंगाबाद खंडपिठात निर्णयाविरोधात जमिन मालकांनी मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान केले असता महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास (defend) केलेले आहे. श्री.अतुल मुंदडा यांनी दि.०४/०४/२०२२ रोजी दिलेल्या अर्जापुर्वी दि.१०/११/२०२१ व दि.१५/०२/२०२२ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी. प्रलंबीत असल्याने शासनास अहवाल सादर करण्यात आला नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यान्वित भुसंपादन प्रकरणामध्ये भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव यांनी दि.०७/१०/२०२२ रोजी घोषित केलेल्या निवाड्यानुसार रक्कम रु.४,०८,१९,५८६/- (चार कोटी आठ लाख एकोणावीस हजार पाचशे शहाऐंशी मात्र) जिल्हाधिकारी कार्यालयात जमा केलेली आहे. मंजुर विकास योजनेत मौजे पिंप्राळा गट नं.१२५ या जमिनीवर आरक्षण क्र.११६ बागीचा करीता आरक्षित असल्याने त्यानुसार भुसंपादनाची कार्यवाही झालेली आहे.

****

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- २९७**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. राजु पारवे, श्री. विनोद अग्रवाल विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५अनुसार दिलेली लक्षेवधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील मोहर्ली वनपरिक्षेत्रातील आगरझरी जंगलातील कक्ष क्रमांक १८९ मध्ये टी-६० या वाघिण व मादी शावक मृतावस्थेत आढळून येणे, हा घटना जवळपास सात दिवसानंतर उघडकीस येणे, मृत वाधिणीचा मृतदेह पुर्णत: कुजलेला असणे, वाघिणीचा मृतदेह मिळाल्यानंतर लगेच दुसरा दिवशी मादी शावकाचा मृतदेह सापडणे, त्यांनतर लगेच दुसरे दिवशी शिवनी वनपरिक्षेत्रात वाघांच्या चार बछडयांचा मृतदेह आढळून येणे, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील दोन वाघ/वाघीण व पाच बछडयांचा मृत्यू हा अतिशय चिंतेचा विषय असून वनविभागाच्या गलथान कारभार आणि संरक्षणातील अव्यवस्थेमुळेच या सात वाघांचा मृत्यू झाला असल्याचा आरोप वन्यजीव अभ्यासकांकडून करण्यात येणे, वनपथक जंगलात गस्त करतात मग अशावेळी सात ते आठ दिवस या मृत्यूची माहितीही वन खात्याला नसल्यामुळे वनविभागात सर्वकाही आलबेल नसल्याचे दिसून येणे, वनविभागाच्या दुर्लक्षपणामुळेच हया गंभीर घटना घडल्याची भावना नागरिकांत निर्माण झाल्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी या सर्व गंभीर घटनेची उच्च स्तरिय अधिकाऱ्यांमार्फतीने सखोल चौकशी होणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री. सुधीर मुनगंटीवार** **मा. मंत्री (वने)**

### निवेदन

चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये ताडोबा राष्ट्रीय उद्यान व अंधारी वन्यजीव अभयारण्याचा समावेश असून व्याघ्र प्रकल्पाचे कोर क्षेत्र ६२५.८२० चौ.कि.मी. आहे. तसेच व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्र ११०१.७७१ चौ.कि.मी. आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात माहे नोव्हेंबर ते डिसेंबर/२०२२ या दोन महिन्याचा कालावधीत वाघाच्या मृत्युच्या ३ घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे.

दिनांक ३०/११/२०२२ रोजी बफर विभागातील शिवणी वनपरिक्षेत्रातील वासेरा नियतक्षेत्रालगत असलेल्या महसूल विभागातील गट क्रमांक १८५ मध्ये बिट वनरक्षक वासेरा व बिट मदतनिस हे गस्त करीत असताना त्यांना दुपारी ३.०० वाजताच्या सुमारास एक वाघिण (टी-७५) (वय १४ ते १५ वर्ष) मृत अवस्थेत आढळून आली. सदर वाघीणीचा शव कुजलेला होता. तथापि दात, नखे इत्यादी अवयव शाबुत आढळुन आले. सदर वाघिणीचे नैसर्गिक वयोमान पुर्ण झाल्यामुळे नैसर्गिक मृत्यु झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन आले व सदर घटनेमध्ये कोणत्याही प्रकारचा घातपात किंवा शिकार झालेली नाही असे दिसुन आलेले आहे.

व्याघ्र प्रकल्पातील बफर क्षेत्रामध्ये मोहर्ली वनपरिक्षेत्रात आगरझरी येथे दिनांक ०१/१२/२०२२ रोजी कक्ष क्रमांक १८७ ते १८९ च्या फायर लाईनच्या बाजुला एक छावा (वय अंदाजे ६-७ महिने) मृत अवस्थेत आढळुन आला. सदर घटना ही दिनांक ३०/११/२०२२ च्यां मध्यरात्री घडुन ती सकाळी ७.१५ वाजता निदर्शनास येवुन सदर छावा (वाघ मादी) ही दुसऱ्या वाघाच्या हल्ल्यात ठार झाल्याचे निदर्शनास आले आहे. घटनास्थळावर दुसऱ्या नर वाघाचे अस्तित्व सुध्दा आढळुन आलेले आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील बफर क्षेत्रामध्ये शिवणी वनपरिक्षेत्रात वासेरा नियतक्षेत्रातील कक्ष क्रमांक २६५ मध्ये दिनांक ०३/१२/२०२२ रोजी ४ छावे (वय ४ ते ५ महिने) मृत अवस्थेत आढळुन

आले. सदरहु घटना ही दिनांक ०२/१२/२०२२ च्या मध्य रात्री घडून ती दिनांक ०३/१२/२०२२ च्या सकाळी निदर्शनास आली. सदर घटनास्थळावर तपासणी दरम्यान नर वाघाचा प्रत्यक्ष वावर आला असुन नर वाघाच्या हल्ल्यामध्येच सदर बछडयांचा मृत्यु झाल्याचे शवविच्छेदन अहवालामध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

वरील सर्व घटनांमध्ये वन कर्मचाऱ्यांच्या नियमित गस्तीमुळेच वाघांच्या मृत्युबाबत उलगडा झालेला आहे. त्यामुळे संरक्षण व्यवस्थेमध्ये कुठेही गलथान कारभार झालेला नाही. वरील तिन्ही घटनांमध्ये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे द्वारा आखुन दिलेले प्रमाणित पध्दतीनुसार त्यांचे प्रतिनिधीचे उपस्थितीत सदर घटनांचा पंचनामा तसेच शवविच्छेदनाची कार्यवाही पार पाडण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ०१/१२/२०२२ व दिनांक ०३/१२/२०२२ रोजीच्या घटनेमध्ये वाघांचा मृत्यु हा परिसरातील दुसऱ्या वाघाच्या हल्ल्यात झालेला असल्याने त्यामध्ये कोणत्याही वन कर्मचाऱ्यांचा दोष नाही.

वाघ तसेच अन्य वन्यप्राण्यांच्या शिकारीला आळा घालण्यासाठी विभागाकडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:

- परिक्षेत्र स्तरावर वाघ व बिबट या वन्यप्राण्यांचे मागोवाचा पंधरवाडी कार्यक्रम राबवून त्यांच्या अस्तित्वाबाबतची माहिती घेण्यात येते.
- संरक्षण कुटीवरील मजूरांना Hejje प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा करण्यात आलेला असून त्याव्दारे वनात आढळणा-या अवैध प्रकार, आगी, शिकार, संस्यस्पद गतीविधीवर नियंत्रण ठेवले जाते.
- पाणवठे व महत्वाचे ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून संशयास्पद हालचालीवर पाळत ठेवण्यात येते. तसेच पाण्यामध्ये विष प्रयोग होऊ नये याकरीता नियमीत पाणवठ्याची तपासणी केली जाते. या व्यातिरीक्त मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने पाणवठ्याकडे जाणा-या मार्गावर शिकारी लोकाव्दारे लोखंडी ट्रॅप लावले नसल्याची खातरजमा करण्यात येते.
- अवैध शिकारी लोकांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खब-याची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते.
- वनक्षेत्रात तसेच वनालगत असलेल्या शेतीमध्ये शिकारीसाठी विदयुत प्रवाह लावले नसल्याबाबत नियमित तपासणी केली जाते.
- विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- गावालगत असलेल्या मुसाफिर लोकांचे डेरे तपासणी करण्यात येते व त्यांचे हालाचालींवर लक्ष ठेवण्यात येते.

********

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

श्री.धनंजय मुंडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४०७ पुढीलप्रमाणे आहे :-

आशिया खंडातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय अशी ओळख असलेले अंबाजोगाई जिल्हा बीड येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात सुमारे १७ कोटी रुपये किमतीची आधुनिक ३.० टेस्ला एमआरआय मशीन बसवण्यात आलेली असणे मात्र अद्याप कायम वीज जोडणी व तज्ञांच्या अभावी ही मशीन धूळ खात पडलेली असणे, याशिवाय वैद्यकीय महाविद्यालयात कर्करोग शास्त्र, स्त्री रोग, बधिरीकरण,कान-नाक-घसा, शरीर विकृती शास्त्र, फिजिओलॉजी, सामाजिक आजार इत्यादी विभागातील प्राध्यापक, विभागप्रमुख व अन्य एकूण २५ महत्वाची पदे रिक्त असणे, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय येथे मराठवाड्यातून हजारो रुग्ण उपचारांसाठी येतात मात्र तज्ञांअभावी त्यांची हेळसांड होत असणे व सदर रिक्त पदे तात्काळ भरावीत तसेच एमआरआय मशीन तातडीने सुरु करण्याची होत असलेली मागणी,यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया.

---

मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांचे निवेदन

आशिया खंडातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय अशी ओळख असलेले अंबाजोगाई, जिल्हा बीड येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जि.बीड या संस्थेकरीता 3 Tesla MRI System with Turn Key with Transformer यंत्र खरेदीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर यंत्रसामुग्री खरेदीसाठी जिल्हा नियोजन समिती, बीड यांच्याकडून निधी उपलब्ध झालेला असून मे.हाफकीन बायोफार्मा, महामंडळ मुंबई यांच्याकडून संस्थेच्या क्ष-किरणशास्त्र विभागास प्राप्त झालेली आहे.

सदर यंत्र संस्थेत प्रस्थापित करण्यासाठी अतिरिक्त विद्युतदाब वाढवून देण्याबाबत संबंधित पुरवठादार कंपनीने संस्थेस विनंती केल्यानुसार सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, उस्मानाबाद यांनी तयार केलेल्या विद्युतविषयक कामाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २०.०९.२०१९, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उपविभाग ५ नियम क्र.१३४ (३) तरतूदीनुसार किरकोळ बांधकामांना २७ लहान बांधकामे या अनिवार्य खर्चाच्या लेखाशीर्षात अथवा संस्थेच्या स्वीय प्रपंची

खात्यात उपलब्ध असलेल्या निधीतून संचालनालय / संस्थास्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत संस्थेस कळविण्यात आले. त्यानुसार संस्थास्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर बाबतची पुढील कार्यवाही स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जि.बीड व सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, अंबाजोगाई यांच्याकडून करण्यात येत आहे.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथील प्राध्यापक, विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील २५ पदे रिक्त असून कर्करोगशास्त्र, स्त्रीरोग, बधिरीकरण, कान-नाक-घसाशास्त्र, शरीरविकृतीशास्त्र, फिजिओलॉजी, सामाजिक आजार विभागापैकी शरीरविकृतीशास्त्र व जनऔषधवैद्यक विभागातील प्राध्यापकांची एकूण ०२ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांमुळे व तज्ञांअभावी रुग्णांची हेळसांड होणार नाही याची दक्षता संस्थेमार्फत घेण्यात येते.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक (वर्ग १) व सहाय्यक प्राध्यापक (वर्ग-२) या संवर्गातील सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२१ मध्ये जाहिराती प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार उमेदवारांच्या शिफारशी प्राप्त होत असून, त्याप्रमाणे रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

*******

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ५७३

श्री. महेश शिंदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५७३ पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यात विधानसभा निवडणूकीकरिता असलेली मतदार यादी ही ग्रामपंचायतीला वापरणे गरजेचे असतांना कोरेगांव मतदार संघातील खेड ग्रामपंचायतीमध्ये मंडळ अधिकारी, तहसिलदार, प्रांत यांच्या चुकीच्या व भ्रष्ट भूमिकेमुळे मतदार यादया चुकीच्या प्रसिध्द करण्यात येणे, त्याच प्रमाणे मतदार यादया तयार करण्याचे (डाटा एन्ट्री ) कंत्राट एका राजकीय पक्षाच्या पदाधिका-यांच्या संस्थेला देण्यात आल्यामुळे पाटखळ ग्रामपंचायतीमध्ये ठराविक ग्रुपला फायदा होईल अशा प्रकारे चुकीची वॉर्ड रचना करणे, या संदर्भात मा. निवडणूक आयुक्तांकडे तक्रार केली असता सदरची निवडणूक स्थगित करण्यात येणे, परंतु या प्रकरणातील दोषी असणा-या अधिका-यांवर कोणतीच कारवाई न झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि.७.१०.२०२२ रोजीच्या सुमारास लेखी निवेदन दिले असता मा.जिल्हाधिकारी, सातारा यांना चौकशी करुन कार्यवाही करण्याचे देण्यात आलेले निर्देश, परंतु अद्यापही त्यावर कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने संबधित दोषी अधिकारी व कर्मचारी याचेवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

<u>मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे निवेदन</u>

मौजे खेड ता.जि.सातारा या ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/ग्रापनि/२०२०/प्र.क्र.४ का-८ दिनांक २/०६/२०२२ अन्वये ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी राबविण्यात येणारा कार्यक्रम प्रसिध्द करणेत आलेला होता. यासाठी दिनांक ३१/०५/२०२२ या अर्हता दिनांकावर प्रसिध्द झालेला भारत निवडणूक आयोगाची मतदार यादी ग्राहय धरायची होती. त्यानुसार प्रारूप मतदार यादी दिनांक १४/०६/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर प्रसिध्द करणेत आलेल्या मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी दिनांक १४/०६/२०२२ ते दिनांक १७/०६/२०२२ असा ठेवणेत आला होता. सदर कालावधी मध्ये मौजे खेड ता.जि.सातारा या ग्रामपंचायतीच्या मतदार यादीवर एकूण २२ हरकती प्राप्त झालेल्या होत्या. सदर हरकतीच्या अनुषंगाने मंडल अधिकारी, खेड यांनी स्थानिक चौकशी व प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून संबंधीतांना नोटीस काढणेत येऊन हरकतीचे निरसन करणेत आले. सदर हरकतीपैकी १ अमान्य ९ मान्य व १२ अंशता मान्य करणेत आलेल्या होत्या. मा.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट राज्य,मुंबई यांनी दिनाक ०२/०६/२०२२ रोजी मतदार यादी प्रसिध्दी कार्यक्रमामध्ये मुददा क्र.५ नुसार प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभाग निहाय मतदार अंतिम करणेबाबत उपमुददा क्र. ५.१ व ५.२ मध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे मतदार यादीमध्ये यथोचित दुरुस्ती करणेत येऊन दिनांक २२/०६/२०२२ रोजी प्रभाग निहाय अंतिम

मतदार यादी प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर मतदार यादी संदर्भात कंट्रोल चार्ट तयार करणेचे काम तलाठी खेड ता.जि.सातारा यांनी केलेले आहे.

मा.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.रानिआ/ ग्रापंनि/२०२०/प्र.क्र.४/का-८ दिनांक २६/०९/२०२२ रोजी ग्रामपंचायत निवडणूक सुधारीत कार्यक्रम प्रसिध्द करणेत आलेला होता. त्यानुसार मौजे खेड ता.जि.सातारा या ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूकीसाठी दिनांक १६/१०/२०२२ रोजी मतदान घेणेत आले. मतमोजणी दिनांक १७/१०/२०२२ रोजी पार पडलेली आहे. व निवडणूक निकालाची अधिसूचना दिनांक २०/१०/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे.

मा.आ.श्री.महेशजी शिंदे सो. यांनी ग्रामपंचायतीची मतदार यादी चुकीची प्रसिध्द केली गेलेने दोषी अधिका-यावर गुन्हे दाखल करणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक ०७/१०/२०२२ रोजी निवेदन वजा तक्रार दाखल केली आहे. त्याअनुषंगाने मा.मुख्यमंत्री सो.महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हाधिकारी सातारा यांना चौकशी करून कार्यवाही करावी असे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरून सदर निवेदनावर या कार्यालयाकडील पत्र क्र.साशा/ग्रापंनि/ आरआर/१/कावि-१२५५/२२ दिनांक १९/१०/२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी सातारा व तहसिलदार सातारा यांना तक्रारीचे अनुषंगाने मौजे खेड ग्रामपंचायतीच्या निवडणूकीसाठी मतदार यादी व विधानसभेची अद्यावत मतदार यादी तसेच इतर आवश्यक सर्व कागदपत्रे तपासणी कामी तात्काळ सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. त्याअनसुरून तहसिलदार सातारा यांनी दिनांक ०२/११/२०२२ रोजी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवाल व लगतची सर्व कागदपत्रे यावरून मा.आमदार महोदयाच्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २२/११/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, सातारा यांना टिपणी सादर करणेत आली. जिल्हाधिकारी, सातारा यांनी प्रस्तुत प्रकरणाची चौकशी अपर जिल्हाधिकारी, सातारा यांचे मार्फत चौकशी करण्याचे नव्याने निर्देश दिलेले आहे. त्याअनुषंगाने चौकशी करणेत येत आहे. तथापि, माहे जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीमध्ये मुदती संपणा-या ३१९ ग्रामपंचायतीचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडून जाहीर करणेत आलेला असल्याने प्रस्तुत प्रकरणी चौकशी प्रलंबीत आहे. तथापि, ती तात्काळ पुर्ण करणेची दक्षता घेत आहोत.

तसेच मौजे पाटखळ ता.जि.सातारा या ग्रामपंचातीच्या निवडणूक तक्रारीचे अनुषंगाने अहवाल पुढील प्रमाणे-

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील आदेश क्र. रानिआ/ ग्रापंनि/ २०१९/ प्र.क्र.१२ / का-८ दिनांक २०/१०/२०२० अन्वये माहे जुलै ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणा-या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी सुधारीत प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम जाहीर झालेला होता. सदर निवडणूक कार्यक्रमानुसार मोजे पाटखळ ता.जि.सातारा येथील अंतीम प्रभाग रचना दिनांक ०२/११/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती सदर प्रभागरचनेवर ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थ अथवा लोकप्रतिनीधी यांनी कोणतीही हरकत घेतलेली नाही.

तदनंतर मा.राज्य निवडणूक आयोग, यांचेकडील निवडणूक क्र. रानिआ /ग्राप/ २०१९ /प्र.क्र. ०१/का -८ दिनाक २०/११/२०२० अन्वये माहे एप्रिल -२०२० ते माहे डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणा-या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मतदार यांदीचा कार्यक्रम जाहीर झालेला होता. त्या मध्ये मौजे पाटखळ ता.जि.सातारा या ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूकीची प्रभाग रचनेबाबत मा. महेश शिंदे, वि.स.स. यांनी दिनांक १६/१२/२०२० रोजी लेखी हरकत घेतली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने मा.उपसचिव मा.राज्य निवडणूक आयोग, यांचेकडून सदर प्रकरणी अहवाल सादर करणेबाबत आदेशित करणेत आलेले होते. त्यानुसार या कार्यालयाकडील पत्र क्र. साशा /कावि /४०३/२०२० दिनांक १७/१२/२०२० अन्वये लेखी अहवाल सादर करणेत आलेला आहे.

सदर हरकतीचे अनुषंगाने उपसचिव, राज्य निवडणूक आयोग,यांचेकडील निवडणूक क्र. रानिआ /ग्राप/२०२०/प्र.क्र.०१/का-८ दिनाक २२/१२/२०२० रोजीच्या आदेशान्वये मौजे पाटखळ ता.जि.सातारा या ग्रामपंचायतीचे सर्व टप्पे रदद करणेत आलेले आहेत.

उपविभागीय अधिकारी, सातारा यांचेकडील पत्र क्र. निवडणूक/ कावि-२१६/२०२० दिनांक ३१/१२/२०२० अन्वये संबधीत तहसिलदार/गटविकास अधिकारी /तत्कालीन गटविकास अधिकारी /मंडल अधिकारी/ तत्कालीन मंडल अधिकारी/ तलाठी/ग्रामसेवक यांनी दिलेले लेखी अहवाल व लेखी खुलासे या कार्यालयाकडील पत्र क्र. साशा /ग्राप/ आर आर /४/१७/२१ दिनांक २५/०१/२०२१ अन्वये राज्य निवडणूक आयोग यांना सादर केलेले आहे.

तदनंतर पुन्हा या कार्यालयाकडील पत्र क्र. साशा /ग्राप /आर आर/४/२१०/२१ दिनांक ०४/०२/२०२१ अन्वये कक्ष अधिकारी, महसूल व वनविभाग मुंबई यांना लेखी अहवाल सादर केलेला आहे.

सदयस्थितीत मौजे पाटखळ ता.जि.सातारा येथील निवडणूकीचे अनुषंगाने याचिकाकर्ता श्री.अतूल संपतराव शिंदे व इतर विरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.११०५७/(स्टॅप) ९९७०५/२०२० दाखल करणेत आलेली आहे.

सदर रिट याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे पुढील सुनावणी दिनांक २३/१२/२०२२ रोजी अशी ठेवणेत आलेली आहे.

मौजे पाटखळ ता.जि.सातारा या ग्रामपंचायतीची प्रारूप प्रभाग रचनेवर गावातील ग्रामस्थ अथवा लोकप्रतिनधी या पैकी कोणीही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत घेतलेली नाही. सर्व ग्रामपंचायतीच्या प्राप्त मतदार यादीची एकत्रित तपासणी करत असतांना पाटखळ ग्रामपंचायतीचे मतदार यादीत वार्ड निहाय असलेला असमतोल निर्देशनास आला तथापि, तोपर्यंत संबधीत तलाठी, ग्रामसेवक, मंडल अधिकारी यांनी सदर मतदार यादी ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दी केली होती. त्यानंतर सदर प्रकरणी सखोल तपासणी केली असता मौजे पाटखळ येथील ग्रामसेवक,तलाठी व मंडल अधिकारी यांनी मुळातच प्रभाग रचना करताना निवासी वास्तु विचारात न घेता प्रभागाची लोकसंख्या निश्चित केलेने प्रत्यक्ष वास्तव्यावरून मतदार यादी तयार झालेवरून प्रभागनिहाय मतदार संख्येत असमतोल झालेचे स्पष्ट होत आहे.याबाबत तहसिलदार सातारा तथा अध्यक्ष प्रारूप प्रभाग रचना समिती यांनी वरिल प्रमाणे खुलासा सादर केलेला असून त्यास उपविभागीय अधिकारी, सातारा यांनी त्यांचेकडील दिनांक २४/१२/२०२२ रोजीचे पत्राव्दारे सहमती दर्शविली आहे.

सदयस्थितीत तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी उपविभाग, सातारा यांनी त्यांचेकडील पत्र क्र.ग्राप/निवडणूक/कावि-११०/२२ दि. २७/१२/२०२२ अन्वये या कार्यालयास अहवाल सादर करुन तहसिलदार, सातारा यांचेडून लेखी निवेदन दिलेच्या पार्श्वभूमिवर क्र.ग्रापंनि/कावि-५०३/२२ दि.१८/१०/२०२२ अन्वये संबंधित तलाठी, मंडल अधिकारी, ग्रामसेवक यांना नोटीसा देवून खुलासे घेण्यात आले. सदर खुलासेच्या अनुषंगाने तहसिलदार, सातारा यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेवून वस्तूस्थितीदर्शक स्वतंत्र अहवाल सादर करणेची दक्षता घेत आहोत. असे कळविलेले आहेत संबधीतांना कडून आवश्यक वस्तुस्थिती दर्शक अहवाल प्राप्त होताच उचित

कार्यवाही करणेची दक्षता घेण्यात येईल असे जिल्हाधिकारी सातारा यांनी दिनांक २९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणी संबंधित ग्रामपंचायतीची नियमबाहय प्रभाग रचना करणारे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर तात्काळ जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत शासनस्तरावरुन दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सातारा यांना कळविण्यात आले आहे.

***************************